जा.क्र.का.15/ **corner plot** व दुकान/
मूल्यांकन/परिपत्रक/ 1281
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि. 17/12/2015.

**विषय :- 12.0 मी.व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या एकापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यास सन्मुख भूखंडाचे (corner plot) / जमिनीचे / corner वरील दुकानगाळयांचे मूल्यांकनाबाबत.**

<u>परिपत्रक :-</u>

वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये एका मूल्य विभागामध्ये सर्वसाधारणत: सर्व भूखंड / दुकानगाळयासाठी एकच सरासरी दर दिलेला असतो. केवळ मूख्य रस्त्यासाठी अशा रस्त्यावरील भूखंड / जमीन / दुकानगाळयासाठी स्वतंत्र जास्तीचा दर दिलेला असतो. दोन रस्त्याच्या corner वरील भूखंडास / जमिनीस / अथवा अशा भूखंडावर दोन्ही रस्त्यासन्मुख बांधलेल्या दुकानगाळयास एकापेक्षा जास्त रस्त्यास सन्मुखता असलेने, इतर भूखंड / जमीन / दुकानगाळयाच्या तुलनेत वाणिज्य क्षमता जास्त असते. पर्यायाने अन्य भूखंड / जमीन / दुकानगाळयाच्या तुलनेत अशा भूखंड / जमीन / corner वरील दुकानगाळयास जास्त मागणी असल्यामुळे त्याचे मूल्य साहजिकच जास्त असते. तरी अशा भूखंड / जमीन / दुकानगाळयाचे मूल्य खालीलप्रमाणे परिगणित करण्यात यावे.

"12.0 मी.व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या एकापेक्षा जास्त रस्त्यास सन्मुख भूखंड (corner plot) / जमीन / corner वरील दुकानगाळयांचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील खुली जमीन / तळमजल्यावरील दुकाने दराच्या 110% दराने करावे. सदर सूचना सदनिका / तळमजल्यावरील निवासी वापरासाठी / वरच्या मजल्यावरील कार्यालये वापरासाठी लागू राहणार नाही."

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी दि.21/12/2015 पासून लागू राहील.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन. )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.

-/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

-/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

10) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता